नि.दि.दावा क्र.५५/२०१९
मिराबाई वि. गोविंद
**निशाणी क्रं. २६**

**वादीतर्फे सा.क्र.२ इंदलसिंग मोतीराम काकरवाल यांचा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. पी. एस. तांदुळजे यांच्यामार्फत सुरु**

मला लिहीता वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गोविंदच्या आजीचे नाव रामकोरबाई आहे. हे म्हणणे खरे आहे की, ४० गुंठे जमिन ही रामकोरबाईच्या नावावरती होती. हे म्हणणे खरे आहे की, सन २००६ मध्ये रामकोरबाईने जमिन वादी यांना विकली. हे म्हणणे खरे आहे की, ती जमिन आता वादीच्या नावाने आहे. त्या जमिनीत आता मक्का पेरला आहे. वादी व प्रतिवादी क्र.१ आज न्यायालयात हजर आहेत. प्रतिवादी क्र.१ व ३ हे ४–५ वर्षापासून वेगळे राहतात. प्रतिवादींना वादीविरुध्द पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली नाही. हे मी सांगु शकत नाही की, खरेदीखत रद्द होण्याकरीता न्यायालयात दावा दाखल केला किंवा नाही. मी वादी व प्रतिवादीमध्ये गावातील व्यक्तीसमोर समझोता झाल्याची तारीख सांगु शकत नाही. लेखी करारनामा झाला होता की नाही हे मी सांगु शकत नाही. वादीने प्रतिवादी क्र.१ ल १२ गुंठे जमिन दिल्याबाबत ७/१२ नाही. मला साक्ष देण्याकरीता न्यायालयाकडुन समन्स मिळाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ ने न्यायालयात साक्ष देण्याकरीता सांगितले म्हणुन मी आलो. प्रतिवादी क्र.१ सोबत माझे संबंध चांगले आहेत. पिंपरी गावाजवळ सरकारी जमिनी आहेत. पिंपरी गावातील लोक गुरे ढोरे चारतात. तेथे माझे ढोरे सुध्दा चारायला जातात. हे म्हणणे खरे आहे की, वादीचे गुरे ढोरे सुध्दा चारायला नेतात. हे म्हणणे खरे नाही की, गुरे ढोरे चारण्यावरुन वादीसोबत वाद झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी च्या प्रेमापोटी आज साक्ष देत आहे. विठ्ठल मोहनसिंग गोमलाडु आज न्यायालयात हजर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

दिनांक २६.०६.२०२५

श्रवणोत्तर स्विकृती

GANESH DATTA GURNULE
Digitally signed by GANESH DATTA GURNULE
Date: 2025.06.27 15:26:15 +0530

(**जी.डी. गुरनुले**)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
खुलताबाद.